# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना :-**

**विषय :- प्रभाग समिती क्रं.5 च्या कार्यक्षेत्रातील हसीन फरहान टॉकीज समोरील मिरॅकल मॉल ते एरोज कोल्ड्रींक, मंडई पारनाका, समदनगर कनेरी इ.परिसरातील रस्त्यांची डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे.**

प्रभाग समिती क्रं.५ च्या कार्यक्षेत्रातील हसीन फरहान टॉकीज समोरील मिरॅकल मॉल ते एरोज कोल्ड्रींक मंडई पारनाका, समदनगर कनेरी इ.परिसरातील रस्त्यांची डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९९,५१०/-मात्रच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक २३/०२/२०२३ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास मा.प्रशासकीय ठराव क्रं.१२२ दिनांक १६/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ४९,९९,५१०/- ई-निविदा सुचना क्र.२३१/२०२२-२३ (८८५१०२) दै. महासागर या वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.१६/०३/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | मे.अक्षय कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| २ | तुषार मोहन चौधरी, भिवंडी | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५२०% कमी दराने |

वरीलपैकी तुषार मोहन चौधरी, भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५२०% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.४९,७३,५१३/- (अक्षरी एकोनपन्नास लाख त्रेत्तर हजार पाचशे तेरा मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणेकामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- १५१ दिनांक :- २८/०४/२०२३

तुषार मोहन चौधरी, भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५२०% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.४९,७३,५१३/- (अक्षरी एकोनपन्नास लाख त्रेत्तर हजार पाचशे तेरा मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्रं.५ च्या कार्यक्षेत्रातील हसीन फरहान टॉकीज समोरील मिरॅकल मॉल ते एरोज कोल्ड्रींक, मंडई पारनाका, समदनगर कनेरी इ.परिसरातील रस्त्यांची डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार तुषार मोहन चौधरी, भिवंडी यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका